सकाळ



आर. के. नगर : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती शहरी गटातून शिंदे सरकार कॉलेजला वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक मिळाला. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे यांचा सत्कार केला. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, संस्थाध्यक्ष श्रीमती माधुरी शिंदे, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. ए. बी. पाटील, प्रा. अनिल कवडे आदी उपस्थित होते.

## तीन इमारतींचे उद्घाटन

दरम्यान, विद्यापीठात नव्याने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचे उद्घाटनही पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रसायनशास्त्र विभाग, 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत मुलींच्या वसतिगृहाची इमारत आणि संशोधक विद्यार्थी वसतिगृहासाठी अशा तीन इमारती बांधल्या आहेत. रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे पहिल्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण झाले आहे. याअंतर्गत तळमजल्याचे ८१६.२९ चौरस मीटर क्षेत्रफळाइतके बांधकाम पूर्ण झाले आहे. संशोधक विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीचे तळघर अधिक तळमजला असे बांधकाम विद्यापीठाच्या स्वनिधीमधून करण्यात आले आहे. एकूण १२९१.०२ चौरस मीटर इतके बांधकाम करण्यात आले आहे. या ठिकाणी एकूण १०० संशोधक विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था होणार आहे. त्याचप्रमाणे 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत तीनमजली इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

लोकमत

रसायनशास्त्र अधिविभाग, दोन वसतिगृहांचा समावेश : चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

# शिवाजी विद्यापीठात तीन नव्या इमारतींची भर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात नव्याने बांधलेल्या तीन इमारतींचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १२) केले. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते, तर प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागासाठी नूतन विस्तारित इमारत बांधली आहे. 'कमवा व शिका' योजनेंतर्गत मुलींच्या वसतिगृहाची इमारत आणि संशोधक विद्यार्थी वसतिगृहासाठी इमारत बांधली आहे. रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतींचे पहिल्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण झाले आहे. यांअंतर्गत तळमजल्याचे ८१६.२९ चौरस मीटर क्षेत्रफळाइतके बांधकाम पूर्ण झाले आहे. संशोधक विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीचे तळघर अधिक तळमजला असे बांधकाम विद्यापीठाच्या स्वनिधीमधून केले आहे. त्या ठिकाणी एकूण १०० संशोधक विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था होणार आहे. इमारतींच्या उद्घाटन कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, व्यवस्थापन परिषद सदस्य राहुल चिकोडे, अमित कुलकर्णी, आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी उभालेल्या वसतिगृहाच्या इमारतीचे उद्घाटन गुरुवारी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. डावीकडून डी. टी. शिर्के, अमित कुलकर्णी, देवानंद शिंदे, संजय जाधव, विलास नांदवडेकर, राहुल चिकोडे, आदी उपस्थित होते.

### 'रुसा'चे अनुदान

'कमवा, शिका'तर्गत तीनमजली इमारतींचे बांधकाम पूर्ण केले आहे. तळमजला स्वनिधी, दोन मजले राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रुसा) अनुदानातून बांधले आहेत. येथे १५० विद्यार्थिनींची निवास व्यवस्था आहे.


## 'शिव साहाय्यता केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण

आपत्ती व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'शिव साहाय्यता केंद्र' स्थापन केले आहे. या केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते गुरुवारी येथे केले. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते, तर प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. केंद्राच्या कार्यवाहीसाठी २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यास मान्यता दिली आहे. या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

# प्रेरणादायी चरित्रग्रंथ

■ **प्राचार्य डॉ. जी. पी. माळी**

**स्वागत पुस्तकाचे**




शिक्षक, संस्थाचालक, साहित्यिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ता म्हणून सर्वपरिचित असणारे बहुआयामी व उपक्रमशील व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. किसनराव कुराडे. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जीवनकार्यांवर प्रकाश टाकण्याच्या आणि त्यांच्याविषयीची उत्कट कृतज्ञता प्रकट करण्याच्या उद्देशाने त्यांनी 'गुरुकुलातील कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार : काळ आणि कर्तृत्व' हा ग्रंथ साकार केला आहे. डॉ. आप्पासाहेब पवार यांचा निकटचा सहवास लाभल्याने एका कर्मयोग्याचा वास्तवदर्शी जीवनपट मांडण्यात ते यशस्वी ठरले आहेत. विद्यापीठाचे शिल्पकार म्हणून त्यांचे चरित्र रेखाटत असतानाच शिवाजी विद्यापीठाचा इतिहास आणि भूगोल समजून घेण्यासाठी हा ग्रंथ आधारभूत व प्रेरणादायी ठरावा, अशी भूमिका बाळगून प्रा. कुराडे यांनी लेखन केल्याचे प्रकर्षाने जाणवते.

डॉ. पवारांचे बालपण, शिक्षण, अध्यायन, प्राचार्य, शिक्षण संचालक, कुलगुरु इत्यादी स्वरुपाचा प्रवास यात बारकाईने आणि तपशीलवार रेखाटला गेला आहे. कुलगुरुपदी विराजमान झाल्यानंतर विद्यार्थी कल्याण मंडळाची स्थापना, विद्यार्थी भवनची उभारणी, कमवा व शिका योजनेची अंमलबजावणी, कंजारभाट स्कूलची स्थापना, कार्यक्षम, स्वाभिमानी, गुणग्राहक, शिस्तप्रिय आणि उदारमतवादी प्रशासक म्हणून झालेल्या वाटचालीवर प्रकाश टाकला आहे. शेवटच्या दोन प्रकरणाद्वारे इतिहास घडविणारे इतिहासकार आणि कुटुंबवत्सल आणि कर्तव्यकठोर आप्पासाहेब या दृष्टीने त्यांच्या संशोधन कार्याचा आणि कौटुंबिक जीवनाचा भावपूर्ण पण, वस्तुनिष्ठ परामर्श घेतला आहे.

प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या विलक्षण प्रभावातून आप्पासाहेबांच्या जीवनाची जडणघडण कशी होत गेली, विद्यापीठाच्या उभारणीसाठी यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन कसे उपयुक्त ठरले इत्यादींविषयीचा तपशील मुळातूनच वाचण्यासारखा आहे. शाहू संशोधन केंद्राची उभारणी आणि कमवा व शिका योजनेची कार्यवाही याविषयी प्रा. कुराडे यांनी अत्यंत तळमळीने, आदराने आणि पोटतिडकीने लिहिल्याचे लक्षात येते. स्वतः प्रा. कुराडे यांनीच शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याविषयीच्या बैठकीत 'कमवा व शिका', योजना सुरु करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली होती. डॉ. पवारांनी तितक्याच तत्परतेने त्याला मान्यता दिली आणि गोरगरिबांच्या मुलांची सोय झाली, ही गोष्ट लक्षणीय होय.

या ग्रंथातून डॉ. आप्पासाहेब पवार शिवाजी विद्यापीठ याबरोबरच प्रा. किसन कुराडे यांच्याही व्यक्तिमत्वाचे विविध पैलु उलगडले गेल्याचे लक्षात येते. डॉ. पवार यांच्याप्रमाणेच तत्कालीन कुलसचिव डॉ. उषा इथापे यांनीही विद्यार्थ्यांवर आईसारखे प्रेम केल्याचे प्रा. कुराडे यांनी सोदाहरण विशद केले आहे. याशिवाय जे. पी. नाईक, बॅरिस्टर खर्डेकर, वि. स. खांडेकर आदी मान्यवरांच्या योगदानाचाही परामर्श लेखकाने विषयानुरुप घेतला आहे. प्रा. चंद्रकुमार नलगे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना, ही या ग्रंथाची आणखी एक जमेची बाजू म्हणता येते.

वर्तमानकाळातील शिक्षण व्यवस्था, संस्थाचालक, शिक्षणमहर्षीऐवजी शिक्षणसम्राटांची चलती या पार्श्वभूमीवर प्रस्तुत चरित्रग्रंथाच्या अनुषंगाने प्रा. कुराडे यांनी डॉ. पवारांच्या स्वभाववैशिष्ट्यांकडे लक्ष वेधनले आहे. ते लिहितात, '१२ वर्षांच्या त्यांच्या कुलगुरू काळात अनेक इमारती बांधून घेतल्या. अकराशे एकर जागा विद्यापीठासाठी मिळवली. पण स्वतःसाठी मात्र कोल्हापुरात एक गुंठाही जागा खरेदी केली नाही. बळकावली किंवा मिळवली नव्हती! एवढ्या इमारती बांधत असताना साधा चार खोल्यांचा छोटा नवीन बंगला स्वतःसाठी बांधण्याची स्वार्थी बुद्धी त्यांना सुचली नव्हती.'

प्रांजळपणा, प्रामाणिकपणा, परखडपणा या त्रिसुत्रीनुसार आत्यंतिक आदरपूर्वक आणि जाणीवपूर्वक चरित्रलेखन करुन प्रा. कुराडे यांनी या ग्रंथाद्वारे डॉ. आप्पासाहेब पवार यांचे शब्दरुपी स्मारक उभारले असून त्यांच्या गुरुभक्तीला वंदन करणे क्रमप्राप्त ठरते.

- पुस्तकाचे नाव : गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार : काळ आणि कर्तृत्व
- लेखक : प्रा. किसनराव कुराडे
- प्रकाशक : अक्षरवेध प्रकाशन, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
- पृष्ठे : १९६
- किंमत : २०० रुपये

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 SEP 2019

पुढारी

# शिव सहाय्यता केंद्राचा उपक्रम स्वागतार्ह

## पालकमंत्री : आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या 'शिव सहाय्यता केंद्रां'तर्गत आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राचा उपक्रम स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

विद्यापीठात गुरुवारी (दि. १२ सप्टेंबर) शिव सहाय्यता केंद्राचे उद्घाटन ना.पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. मंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाने शिव सहाय्यता केंद्राच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षणाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीचा महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. महापुरासारख्या आपत्तीच्या क्षणी अशा प्रशिक्षित मनुष्यबळाचा शासन व प्रशासनाला निश्चितपणे सकारात्मक उपयोग होत असतो. त्या दृष्टीने या केंद्राला मोठे महत्त्व आहे.



**कोल्हापूर : विद्यापीठातील 'शिव सहाय्यता केंद्रां'तर्गत आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, संजय जाधव, पंकज मेहता आदी.**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापूर, सांगली, सातारा या विभागात यंदा अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व पूर परिस्थितीमुळे झालेले नुकसान पाहता भविष्यात योग्य ती खबरदारी घेण्यासाठी जागृती व आपत्ती व्यवस्थापन नियोजनाच्या मार्गदर्शनासाठी विद्यापीठाने शिव सहाय्यता केंद्रांतर्गत आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याचे ठरविले. केंद्राच्या प्रारूप आराखड्याला व अनुषंगिक पदनिर्मितीसाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. केंद्राच्या कार्यवाहीसाठी २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यास मान्यता दिली आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, राहुल चिकोडे, व्यवस्थापन परिषदेवरील राज्यपाल नियुक्त सदस्य अमित कुलकर्णी उपस्थित होते.

# ‘शिव सहाय्यता उपक्रम स्वागतार्ह’

## आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ‘शिव सहाय्यता केंद्रां’तर्गत ‘आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राचा उपक्रम अत्यंत स्वागतार्ह असल्याचे गौरवोद्गार पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी येथे काढले.

विद्यापीठात शिव सहाय्यता केंद्राचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. मंत्री पाटील म्हणाले, ‘विद्यापीठाने शिव सहाय्यता केंद्राच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षणाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीचा महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. महापुरासारख्या आपत्तीच्या क्षणी अशा प्रशिक्षित मनुष्यबळाचा शासन आणि प्रशासनाला निश्चितपणे सकारात्मक उपयोग होत असतो. त्या दृष्टीने या केंद्राला मोठे महत्त्व आहे.’

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या केंद्राची माहिती दिली.कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण करताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 SEP 2019
पुढारी

# विद्यापीठात तीन नूतन इमारतींचे उद्घाटन

## रसायनशास्त्र विभाग, संशोधक वसतिगृह, 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृहाचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात नव्याने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते गुरुवारी झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

रसायनशास्त्र अधिविभागासाठी नूतन विस्तारित इमारत बांधण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'कमवा व शिका' योजनेंतर्गत मुलींच्या वसतिगृहाची इमारत आणि संशोधक विद्यार्थी वसतिगृहासाठी इमारत अशा तीन इमारती बांधण्यात आल्या आहेत. या सर्व इमारतींचे उद्घाटन गुरुवारी सकाळी पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नूतन संशोधक विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारत कोनशिला अनावरणप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

कोनशिला अनावरण आणि इमारतींमध्ये फीत कापून प्रवेश करून हे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, राहुल चिकोडे, व्यवस्थापन परिषदेवरील राज्यपाल नियुक्त सदस्य अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाकडून पूरग्रस्त विद्यार्थ्यांची फी माफ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात आलेल्या महापुराचा फटका बसलेल्या पूरग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आला. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील ६०० पूरबाधित गावांतील महाविद्यालये व विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत मिळणार आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील पुरामुळे नुकसान झालेल्या महाविद्यालयांना विद्यापीठातर्फे आर्थिक निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ऑगस्टमध्ये कोसळलेल्या पावसामुळे कोल्हापूर व सांगलीसह साताऱ्यातील काही गावांवर महापुराचे संकट कोसळले. या महापुरामुळे अनेक महाविद्यालयांमध्ये पाणी घुसल्याने नुकसान झाले. प्रयोगशाळा, ग्रंथालयातील साहित्य पुरात वाहून गेले तसेच खराब झाले. त्याचप्रमाणे कोल्हापूर, सांगली या दोन जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नदीकाठावरील गावेच्या गावे पाण्याखाली गेली होती. कोल्हापूर शहरातील महावीर कॉलेज, शहाजी कॉलेजमध्येही पाणी घुसले होते. पुरामध्ये ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक साहित्याचे नुकसान झाले, घरांची पडझड झाली, तसेच शेतीचे नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे मदत करण्याबाबत चर्चा झाली होती. त्यानुसार विद्यापीठाच्या अखत्यारीतील कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पूरग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाला कळवावी, असे पत्र विद्यापीठ प्रशासनाने कॉलेजना पाठवले होते. त्यानुसार १६ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत पूरबाधित गावांसह शहरातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती कॉलेजतर्फे विद्यापीठाला सादर करण्यात आली.

> ‘ऑक्टोबरपासून शिवाजी विद्यापीठाच्या सत्र परीक्षेला सुरुवात होणार आहे. त्यासाठी सध्या परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना मिळालेल्या या मदतीचा दिलासा मिळाला आहे. ६०० पूरग्रस्त गावातील विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी होणार आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**६०० गावांतील ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना दिलासा**



### पूरबाधित महाविद्यालयांना ५ लाखापर्यंत मदत

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील पूरबाधित महाविद्यालयांना पाच लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आला आहे. येत्या आठवड्यात या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. नुकसानीच्या स्वरूपावर तीन टप्प्यात ही मदत देण्यात येणार आहे. समितीने दिलेल्या अहवालानुसार पुरात गंभीर नुकसान झालेल्या महाविद्यालयांना ५ लाख, मध्यम स्वरूपाचे नुकसान झालेल्या महाविद्यालयांना २ लाख तर थोडे नुकसान झालेल्या महाविद्यालयांना १ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. अर्थसहाय्य मिळालेल्या महाविद्यालयांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील महावीर कॉलेज, शहाजी कॉलेज, गोखले कॉलेज, कलाप्रबोधिनी इंटिरिअर कॉलेजसह चिखली, तिसंगी, कुरुंदवाड व हलकर्णी येथील महाविद्यालयांचा समावेश आहे.

# पूरबाधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ : कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पूरबाधित विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात प्रथम सत्र परीक्षा शुल्कमाफी, बाधित महाविद्यालयांना अर्थसहाय्य आदींसह काही महत्त्वाचे निर्णय घेऊन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने पूरबाधित विद्यार्थी आणि महाविद्यालये यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पूरबाधित विद्यार्थ्यांचे



शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रथम सत्राचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पुरामुळे ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे खराब अथवा गहाळ झाली आहेत, त्यांना पुनःश्च मागणी केल्यास दुबार पदवी प्रमाणपत्रे आणि विद्यापीठाशी निगडित इतर शैक्षणिक कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेतला आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे बारा महाविद्यालयांचे पुरामुळे मोठे नुकसान झाले. या महाविद्यालयांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत मिळण्यासाठीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवण्यात यावेत, तसेच त्यांना शैक्षणिक साहित्य व पुस्तके खरेदी करण्यासाठी विद्यापीठाकडून अर्थसहाय्य देण्यासही व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, विद्यापीठाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ऑगस्ट २०१९ मधील एक दिवसाचे वेतनही मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्यात आल्याची माहितीही कुलगुरू डॉ. शिंदे

लोकमत

# पूरबाधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी

## देवानंद शिंदे : महाविद्यालयांना अर्थसाहाय्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पूरबाधित विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात प्रथम सत्र परीक्षा शुल्कमाफी, बाधित महाविद्यालयांना अर्थसाहाय्य, आदींसह काही महत्त्वाचे निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतले आहेत. या निर्णयांद्वारे संबंधित विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पूरबाधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२०च्या प्रथम सत्राचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. पुरामुळे शैक्षणिक कागदपत्रे खराब अथवा गहाळ झाली आहेत, त्या विद्यार्थ्यांना त्यांनी पुन्हा मागणी केल्यास दुबार पदवी प्रमाणपत्रे आणि विद्यापीठाशी निगडित इतर शैक्षणिक कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे १२ महाविद्यालयांचे पुरामुळे मोठे नुकसान झाले. त्यांना मुख्यमंत्री साहाय्यता निधीमधून मदत मिळण्यासाठीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावेत. त्यांना शैक्षणिक साहित्य, पुस्तके खरेदी करण्यासाठी विद्यापीठाकडून अर्थसाहाय्य देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. पूरबाधित विद्यार्थ्यांची माहिती घेण्याचे काम सध्या सुरु आहे. येत्या चार दिवसांत माहिती संकलित होईल, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### साहाय्यता निधीसाठी एक दिवसाचे वेतन

दरम्यान, विद्यापीठाच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट २०१९ मधील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री साहाय्यता निधीसाठी देण्यात आल्याची माहिती कुलगुरु डॉ. शिंदे यांनी दिली.